# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २७ मार्च, २०१५ / चैत्र ६, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पूनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन मंत्री** | |
| **(३)** | **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४०**

---

**भादा (ता.औसा, जि.लातूर) परिसरातील शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकाचे बियाणे उगवले नसल्याची तक्रार करुनही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न मिळाल्याबाबत**

**(१) * १३२९२ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भादा, (ता.औसा,जि.लातूर) परिसरातील शेतकऱ्यांनी माहे जून, २०१४ मध्ये सोयाबीन पिकाचे बियाणे उगवले नसल्याप्रकरणी तक्रार करुनही, कृषी विभागाने पंचनामा करुनही शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, ही बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व संबंधित प्रकरणी जबाबदार कंपन्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

(३) सदर प्रकरणी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने अप्पर जिल्हाधिकारी, लातूर यांनी बातमीची दखल घेवून तक्रारदार शेतकरी, जिल्हा व्यवस्थापक, महाबीज, लातूर आणि कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांची सुनावणी घेऊन महाबीजला पंचनाम्याच्या आधारे देय होणारी नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यास अदा करण्याचे आदेशीत केले. त्याप्रमाणे तक्रारदार शेतकऱ्याला ३ बियाण्यांच्या बॅगांपोटी रु.७,१५५/- एवढी रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात आलेली आहे.

महाबीज अकोला यांचेकडून २१३ बॅगांपोटी ५,०८,००५/- रु. ७७ शेतकऱ्यांना मदत देण्यात आलेली असून १९ शेतक-यांना ६३ बॅगांपोटी रु.१,५०,२५५/- इतकी मदत रक्कम देण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिरंगे व तिलारी प्रकल्पाजवळील बेकायदेशीर दगड खाणी बंद करण्याबाबत**

**(२) * १५०४९ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिरंगे व तिलारी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या बेकायदेशीर काळा दगड उत्खनन खाणी ताबडतोब बंद न झाल्यास दोडामार्ग तहसील कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशारा बोडदे सरपंच यांनी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी दगडाचे उत्खनन होत असल्याने वारंवार स्फोट होत असल्याने धरणाला धोका निर्माण झाला असून सदर स्फोटामुळे शिरंगेसह खानयाळे, बोडदेला हादरा बसला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सतत उत्खनन व स्फोटामुळे सिंधुदुर्ग गोवा राज्यातील शेतकऱ्यांचे भवितव्य धोक्यात आले असून तिलारी धरणाच्या खाली येणारी सुमारे ३५ पेक्षा जास्त गावे येत असल्याने दुर्घटना झाल्यास हजारो कुटुंब उध्दवस्त होतील, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशी नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) या संदर्भात सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत बोडदे यांचे दिनांक ०५/११/२०१४ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

(२), (३), (४), (५) व (६) मौजे शिरंगे येथील सर्वे नंबर ६८/२ व ६९/२ मध्ये खाणपटटा मंजूर

असून, त्याची मुदत दि. ३०.०३.२०१६ अखेरपर्यंत आहे. सदर खाणपट्टाधारकाकडून अधिकृत स्फोटक परवानाधारकामार्फत स्फोटकाचा वापर करुन उत्खनन करण्यात येते. सदर उत्खनन करताना केलेल्या स्फोटामुळे शिरंगेसह खानयाळे, बोडदेला हादरा बसण्याची व धरणाला धोका झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. सदर खाण तिलारी धरणापासून दीड ते दोन कि.मी. अंतरावर आहे. सदर खान पट्यातुन सध्या उत्खनन बंद आहे.

तसेच मौजे शिरंगे येथील सर्वे नंबर ७०/२ मध्ये १७१ ब्रास काळ्या दगडाचे अवैध उत्खनन केल्याचे दृष्टोत्पत्तीस आल्यानुसार संबंधितावर रुपये ३,४२,०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे.

-----------------

**माजिवडे (ता.जि.ठाणे) येथील जमिनीच्या ७/१२ उताऱ्यामध्ये नियमबाह्यरित्या फेरफार करण्यात आल्याबाबत**

**(३) * १५१६७ श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजिवडे ठाणे येथील सर्वे नं. २४/१ च्या जमिनीचा मुळ मालक मयत असतानाही त्याचा बनावट अंगठा दर्शवून जमिनीच्या ७/१२ मध्ये नियमबाह्यरित्या फेरफार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीची विक्री अथवा विकास करण्याबाबत कोणतेही कायदेशीर दस्त उपलब्ध नसताना बनावट कागदपत्रांद्वारे संबंधित विकासकाने नियमबाह्यरित्या फेरफार करुन जमिन बळकावली असल्याप्रकरणी शासनाकडे तसेच तहसिलदार, ठाणे यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वे नं. २४ /१ च्या शेजारील सर्वे नं. २१/१ वर देखील या विकासकाने अनधिकृतपणे बहुमजली इमारतीचे बांधकाम केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशी अंती संबंधित अधिकारी व विकासक यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच उक्त अनधिकृत बांधकाम निष्काषित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) मौजे माजिवडे, ता.जि.ठाणे येथील स.नं. २४/१ या जमिनीच्या अधिकार अभिलेखात भोगवटादार सदरी एकूण १४ व्यक्तींची नावे समाविष्ट आहेत. सदर जमिनीच्या विकसन करारनाम्याची नोंद फेरफार क्रमांक २५२२, दिनांक २६/१२/२००६ अन्वये दाखल करण्यात आली असता सदर फेरफार नोंदीसंबंधी सर्व हितसंबंधी यांना तलाठ्याने वर्दी नोटीस दिली. सदर वर्दी नोटीसच्या कार्यालयीन प्रतीवर भोगवटादारांपैकी श्री.जगन्नाथ बाळा पाटील यांच्या नावासमोर अंगठ्याचा ठसा असल्याचे दिसून येते. सदर नोंद दि. ८/२/२००७ रोजी मंजूर करण्यात आली असून सदर नोंदी विरुध्द

भोगवटारांपैकी श्री.इंद्रपाल बाळा पाटील यांनी उप विभागीय अधिकारी, ठाणे यांच्याकडे दाखल केलेल्या अपील क्रमांक २०३/२०१० मध्ये श्री.जगन्नाथ बाळा पाटील हे दिनांक २५/१०/२००६ रोजी मयत झाल्याचे निदर्शनास आणून दिले.

(३) मौजे माजिवडे, ता.जि.ठाणे येथील स.नं. २१/१ व स.नं. २४/१ या मिळकती शेजारी नसून स.नं. २१/१ या मिळकतीस दिनांक १५/०३/२००४ च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांनी अकृषिक वापरास परवानगी दिली असून ठाणे महानगरपालिकेने स.नं. २१/१ बाबत दिनांक १९/१२/२००३ रोजी बांधकाम परवानगी दिलेली आहे.

(४), (५) व (६) प्रश्न भाग (१) व (२) मध्ये नमूद प्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी होऊन तत्कालीन तलाठी, मंडळ अधिकारी यांच्याविरुध्द तसेच संबंधित विकासकाचे संपर्क सहायक त्यांच्याविरुध्द भा.दं.वि. कलम ४६५, ४६६, १६६, १६७, २१७, १२०(ब), १०९ व ३४ सह ला.लु.प्रति.का. कलम १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे ठाणेनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरचा गुन्हा न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

उक्त दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तत्कालीन तलाठी यांना दिनांक २१/११/२०१३ पासून निलंबित करण्यात आले होते.

-----------------

## घारगाव (ता.श्रीगोंदा,जि.अहमदनगर) येथे अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या डाळिंब व द्राक्ष बागांचे झालेले नुकसान

**(४) * ११९७३ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील घारगाव येथे दिनांक १३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस होऊन त्यात तेथील शेतकऱ्यांच्या डाळिंब व द्राक्ष बागांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागातील कृषी सहाय्यक यांनी या भागात पाहणी केली, परंतु पाऊस झाला नसल्याचा निष्कर्ष काढून चूकीची माहिती संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात प्रांताधिकारी यांच्याकडे कृषी सहाय्यकांविरुध्द तक्रार केल्यानंतर महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पाहणी करण्याच्या सूचना देऊन अहवाल मागविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अहवालातील शिफारशीचे स्वरुप काय, त्यानुसार आपादग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत  नाही.

-----------------

**माळीण (ता.आंबेगाव, जि.पुणे) गावाचे पुर्नवसन न झाल्याबाबत**

**(५) * ५२१९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे जुलै, २०१४ मध्ये पुणे जिल्हयातील आंबेगाव तालक्यातील माळीण गाव मुसळधार पावसाने डोंगराचा कडा कोसळून गावातील ४४ घरे गाडली जावून त्यात १५१ लोकांचा मृत्यु झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माळीण गावाच्या पुनर्वसनासाठी शासनाकडून १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल असे जाहीर करुनही प्रत्यक्षात तरतूद केली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार माळीण गावाचे तातडीने पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे.
(२), (३) व (४) मदत व पुनर्वसन विभागाकडील लेखाशिर्षाखाली निधी उपलब्ध करण्याबाबत दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ रोजी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत शेतकऱ्यांना अनुदान वाटप झालेले नसल्याबाबत**

**(६) * १२९५२ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत २२१ कोटी ८७ लाख ४७ हजार तर राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ५० कोटी असे २७१ कोटी ८७ लाख ४७ हजार मंजूर निधी असताना माहे नोव्हेंबर, २०१४ पर्यंत एकाही शेतकऱ्याला अनुदान वाटप झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त निधी वाटपाबद्दल शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत-शेतावरील पाणी व्यवस्थापन उपअभियानासाठी सन २०१४-१५ या वर्षासाठी केंद्र व राज्य हिस्सा मिळुन रु. २२१.४७ कोटी व राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून रु. १००.०० कोटी व त्याप्रमाणात राज्य हिस्सा रु. २४.८२ कोटी असा एकुण रु. ३४६.२९ कोटी नियतव्यय उपलब्ध आहे.

केंद्र शासनाकडून पहिल्या हप्त्यापोटी प्राप्त झालेला रु. ६२.५० कोटी निधी जिल्हा स्तरावर वाटप करण्यात आलेला आहे. सदर निधी व त्याप्रमाणात राज्य हिश्श्याचा रु.१५.६२ कोटी अशा एकूण रु. ७८.१२ कोटी निधीपैकी रु. ४०.२० कोटी व राष्ट्रीय कृषि विकास योजनेतील रु. १२४.८२ कोटीपैकी रु. १०.४५ कोटी निधी शेतक-यांच्या खात्यात वर्ग करण्यात आला आहे.

केंद्र शासनाकडून दुस-या हप्त्याची रक्कम रु. ११५.०० कोटी वितरीत करण्यात आली असून सदर रक्कम आयुक्त कृषि यांना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मुंबई महानगर क्षेत्रात तीन मोठ्या खाजगी टॅक्सी कंपन्या**
**अनधिकृतपणे व्यवसाय करीत असल्याबाबत**

**(७) * १४५९५ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.भिमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर क्षेत्रात टॅक्सी व्यवसायासाठी विविध परवाने आणि नोंदणींची आवश्यकता असतानाही तीन मोठ्या खाजगी टॅक्सी कंपन्या गेले वर्षभर नियमांना डावलून व्यवसाय करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उक्त चौकशीनुसार नियमबाह्य टॅक्सी व्यवसाय करणाऱ्या संबंधित कंपन्यांवर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन ग्राहकांच्या प्रवासाच्या मागणीनुसार पर्यटक वाहन (टुरिस्ट टॅक्सी) मालकांशी संपर्क करुन ग्राहकांना टॅक्सी सेवा उपलबध करुन देण्याची कार्यवाही काही कंपन्यांमार्फत करण्यात येत आहे. अशा कंपन्यांना 'समुच्चयक' असे संबोधून त्यांची नोंदणी करण्यासंदर्भात तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत उपाययोजना करण्यासाठी नियमावली बनविण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मेरा बु. (जि.बुलढाणा) येथे राखीव ठेवण्यात आलेल्या जमीनीच्या ७/१२ मध्ये बेकायदेशीरपणे फेरफार केल्याबाबत**

**(८) * १५०५९ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेरा बु. (जि.बुलढाणा) येथे मुस्लिम समाजासाठी गावालगत गट क्र. ७३३ मध्ये ९१ आर जमिन मशिदीसाठी व ५ आर जमिन स्मशानभूमीसाठी राखीव ठेवण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर जमिनीच्या ७/१२ मध्ये तलाठी व मंडळ अधिकारी यांनी संगनमताने खाडाखोड करुन परस्पर ती गावातील दुसऱ्याच व्यक्तींच्या नावे केल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) मेरा बु. ता. चिखली, जि.बुलढाणा येथील गट क्र. ७३३ ही जमीन स्मशानभूमीसाठी राखीव ठेवण्यात आलेली नाही. तथापि गट क्र. ७३६ (क्षेत्र ०.९१ हे. आर) या जमिनीच्या वर्ष १९८१-८२ ते १९९५-९६ या कालावधीच्या गाव नमुना क्र. ७/१२ मध्ये ०.०५ हे. आर जमीन स्मशानभूमिसाठी घेण्यात आल्याची पेन्सिलची नोंद आहे. मात्र सदर नोंद अधिकार अभिलेखाच्या पुनर्लेखनानंतरच्या गाव नमुना क्र. ७/१२ मध्ये आढळत नाही.

सदरहू स्मशानभूमीच्या जमिनीची नोंद सातबारा वरुन कमी केल्याबाबत ग्रामस्थ, रा. मेरा बु. यांनी दि. २५/११/२०१४ रोजी तहसिलदार, चिखली यांना निवेदन दिले आहे. सदर निवेदनाची नायब तहसिलदार, चिखली यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे. गट क्र. ७३६ च्या गाव नमुना क्र. ७/१२ मध्ये फेरफार क्र. २२१८ (मंजूर दि. १५/५/२००८) अन्वये विद्यमान खातेदाराचे नाव लावण्यात आलेले आहे व पूर्वीच्या खातेदाराची नावे वगळण्यात आलेली आहेत.

-----------------

**डिंगणे टाकवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे काजू बागायतीला आग लागून १६०० एकरपेक्षा जास्त क्षेत्र आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याबाबत**

**(९) * १३४३९ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिंगणे टाकवाडी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे काजू बागायतीला आग लागून १६०० एकरपेक्षा जास्त क्षेत्र आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने काजू बागायतदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) चौकशी अंती सदरहू बागायदारांना शासनाने आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील डिंगणे येथे दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी अचानक आग लागून ३७ शेतक-यांचे सुमारे २५.९८ लाखाचे नुकसान झाल्याचे तहसिलदार, सावंतवाडी यांच्या पंचनामा अहवालावरुन दिसून येते. या प्रकरणी सखोल चौकशीअंती निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मुंबईत देशी, विदेशी आणि गावठी दारुच्या तस्करीत वाढ झाल्याबाबत**

**(१०) * १४१८४ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत देशी, विदेशी आणि गावठी दारुच्या तस्करीत वाढ झाली असून राज्य उत्पादन शुल्क विभागाने माहे एप्रिल ते डिसेंबर, २०१४ दरम्यान केलेल्या कारवाईत सुमारे अडीच कोटी रुपयाहून अधिक मद्यसाठा जप्त करण्यात आला आणि २ हजाराहून अधिक आरोपींना प्रशासनाने अटक करुन त्यांचेवर गुन्हे दाखल केले असे दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरात गावठी दारु तस्करीच्या केसेस जास्त असून मुंबईत गावठी दारु तयार होत नसली तरी ठाणे जिल्ह्यातून त्याची तस्करी केली जाते असे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत होणारी मद्याची तस्करी रोखण्यासाठी शासनाने कोणती कारवाई व उपाययोजना केली अथवा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध मद्याची निर्मिती व विक्री होऊ नये यासाठी नियमित कारवाया करुन माहे एप्रिल, २०१४ ते डिसेंबर, २०१४ या कालावधीत मुंबई शहर व मुंबई उपनगरे या जिल्ह्यात एकूण २४३४ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यानुसार २३०० आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात सुमारे २.६९ कोटी रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

(२) मुंबई उपनगरे व ठाणे जिल्ह्यातून काही प्रमाणात गावठी दारु अवैधरित्या वाहतुक करुन मुंबई शहरात विक्रीसाठी येत असल्याचे आढळून आले आहे.

(३) अवैध मद्यासाठी विक्री होऊ नये यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना संशयित ठिकाणी गस्त घालून अवैध मद्याशी निगडीत गुन्हे नोंदविण्याबाबत वेळोवेळी निदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बारामती जिल्ह्यातील परिवहन कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी अपहार केल्याबाबत**

**(११) * ६४०१ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१० ते २०१२ या कालावधीत मोटारवाहन कर, व्यवसाय करापोटी जमा होणारी रक्कम लेखा कोषागारात न भरता बारामती परिवहन कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांनी ७३.७६ लाखांचा तब्बल २ वर्षे वापरुन अपहार केल्याची बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणल्यानंतर तातडीने भरण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईच्या परिवहन आयुक्त कार्यालयाने याप्रकरणी दिनांक ७ जानेवारी, २०१४ रोजी पत्र पाठविल्यानंतर त्यानुसार बारामती तालुका पोलीस ठाण्यात उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी फिर्याद नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१२ साली घडलेले प्रकरण जेव्हा निदर्शनास आले त्यावेळेही गुन्हा दाखल करण्यात आला नाही तर मुंबई प्रादेशिक कार्यालयाने कळविल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंपूर्ण गैरकारभार व अपहाराबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे संबंधितांविरुध्द कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय, हे खरे आहे.

मा. महालेखापाल, मुंबई यांच्या निरीक्षण पथकाने सन २०१०-२०११ साली ऑक्टोबर, २०१० व मार्च, २०११ या महिन्यातील लेखापरिक्षणात रु.९,४३,७८५/- एवढ्या रक्कमेच्या व्यवसाय कराची रक्कम कोषागारात आढळून येत नसल्याचे आक्षेप नोंदविले होते. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांच्या अंतर्गत लेखा परिक्षणात उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती येथे दिनांक ०५.०७.२००८ ते दिनांक ३१.०५.२०१२ या कालावधीतील अंतर्गत लेखा परिक्षणात सदर व्यवसाय कराची भरणा न झालेली रक्कम रु.७३.७६ लाख असल्याचे निष्पन्न झाले आहे. व्यवसाय करापोटी रु.७३.७६ लाख इतकी रक्कम माहे सप्टेंबर, २०१२ या महिन्यात व्यवसाय कर लेखाशिर्ष ००२८ या खात्यावर भरले.

(२) होय,

परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी आदेशित केल्यानुसार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बारामती यांनी दिनांक ०९.०१.२०१५ रोजी बारामती तालुका पोलीस स्टेशन या ठिकाणी फिर्याद क्रमांक ८/१५ नोंदविली आहे.

(३) होय,

परिवहन आयुक्त कार्यालयाने कळविल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच काही कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यात आली. तथापि, या प्रकरणांची व्याप्ती आणि गांभिर्य विचारात घेऊन परिवहन आयुक्त यांनी या प्रकरणांची सखोल चौकशी करण्याकरिता एक समिती अपर परिवहन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१.०१.२०१५ रोजी गठित केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाकडून राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना विशेष पॅकेज देण्याच्या शासन निर्णय झाला नसल्याबाबत**

**(१२) * ६०८९ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.बच्चू कडू (अचलपूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना ३ हजार ९२५ कोटी रुपयांची मदत देण्याची घोषणा दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना विशेष पॅकेज देण्याची घोषणा झाली तरी अद्याप शासन निर्णय झाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने घोषणा केल्याप्रमाणे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) राज्यातील सन २०१४ च्या खरीप हंगामातील बाधित शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी शासन निर्णय दि. ०७.०१.२०१५ व दि. ०२.०२.२०१५ अन्वये प्रत्येकी रु.२०००/- कोटी याप्रमाणे एकूण रु.४०००/- कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सिंदखेडराजा तालुक्यातील (जि.बुलढाणा) वाघजाई, सावंगी शिवारात परवानगी न घेताच विद्युत टॉवर उभारण्याचे काम सुरु असल्याबाबत**

**(१३) * १५०३७ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेड राजा तालुक्यातील (जि.बुलढाणा) वाघजाई, सावंगी शिवारात परवानगी न घेताच महावितरण महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी व पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन इंडिया लिमिटेड भोपाळ, धुळे ट्रान्समिशन कंपनी अशा ११ कंपन्यामार्फत विद्युत टॉवर उभारण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरु असल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत सिंदखेडराजा तहसिल कार्यालयासमोर १८ शेतक-यांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ पासून बेमुदत उपोषण केले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) मोबदला न मिळाल्याने सिंदखेडराजा तहसिल कार्यालयासमोर १८ शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या दिवशी उपोषण केल्याचे खरे आहे.
(३) तहसिलदार, सिंदखेडराजा यांनी संबंधित शेतकरी व पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे अधिकारी यांच्यात चर्चा घडवून आणली व पिकाचा योग्य मोबदला दिला जाईल अशी सकारात्मक चर्चा झाल्याने उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घेतले.

मे. पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. व महाराष्ट्र ईस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. या कंपन्यानी विद्युत वाहिन्यांच्या कामात अडथळा निर्माण झाल्याने संबंधित शेतमालकांच्या विरुध्द टेलीग्राफ ॲक्ट १८८५ नुसार जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे प्रकरणे दाखल केली होती. जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी नियमानुसार योग्य मोबदला देणे कंपन्यांना बंधनकारक राहिल व कंपनीने दिलेला मोबदला मान्य नसल्यास संबंधीत शेतमालकांनी जिल्हा न्यायालयाकडे दाद मागावी असे संबंधितांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाने चंद्रपूर सोबतच यवतमाळ जिल्ह्यात दारुबंदी करण्याबाबत**

**(१४) * १५४८८ श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने चंद्रपूर सोबतच यवतमाळ जिल्ह्यात दारुबंदी करावी अशी मागणी आदिवासी महिला संघर्ष समितीकडून मा.मुख्यमंत्री महोदयांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सुमारे १ हजार २०० ग्रामसभेच्या दारुबंदीच्या ठरावाची दखल घेता जिल्ह्यात दारुबंदी लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) यवतमाळ जिल्ह्यात दारुबंदीचा निर्णय घेण्याबाबत यवतमाळ जिल्ह्यातील जिल्हा परिषद सदस्य, महिला बचत गट व इतर ग्रामस्थ यांनी दि. ३.३.२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिलेले आहे.

(२) निवेदनाद्वारे जिल्ह्यात दारुबंदी करण्याबाबत नियमात तरतूद नाही. तथापी, एखाद्या गावात किंवा प्रभागात दारुबंदी करण्याबाबतची कार्यपध्दती शासन अधिसूचना दि. २५ मार्च, २००८ व दि. १२.२.२००९ नुसार विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन दिल्यास त्यांच्याकडून संबंधित गावात किंवा प्रभागात दारुबंदी करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येते. सद्यस्थितीत यवतमाळ जिल्ह्यात दारुबंदी करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वर्धा जिल्ह्यातील शासकीय स्तरावर दारुबंदी असली**
**तरी अवैधपणे दारुविक्री सुरुच असल्याबाबत**

**(१५) * ५४२३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील शासकीय स्तरावर दारुबंदी असली तरी अवैधपणे दारुविक्री सुरुच असून गावातील १७५ दारुचे अवैध धंदे बंद करावेत या मागणीसाठी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास महिला व विद्यार्थी यांनी रस्त्यावर येऊन मोर्चा काढला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्ह्यात छुप्या पध्दतीने अवैधरित्या दारु विक्री करणा-यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) छुप्या पध्तीने अवैध दारु विक्री करणा-या विक्रेत्याकडे छापे टाकून दारुबंदी कायद्यान्वये कार्यवाही केली जाते. त्याशिवाय अवैध दारु विक्रीचा व्यवसाय करणारे यांचेवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन दारुचे समुळ उच्चाटन होणेकरिता कार्यवाही करण्यात येते. दारु विक्रेत्यांवर छापे टाकण्यासाठी जिल्हा स्तरावर व उप विभागांतर्गत विशेष पथके नेमण्यात आली असून त्याद्वारे कार्यवाही करण्यात येते. अवैध दारु विक्रेत्यांविरुध्द मुंबई दारुबंदी कायद्यान्वये कलम ९३ अन्वये कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील घरगुती वीज ग्राहकांसाठी दरवाढ करण्याबाबत महावितरण कंपनीचा प्रस्ताव**

**(१६) * १४३८२ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीने राज्यातील वीज दरवाढीचा प्रस्ताव राज्य वीज नियामक आयोगाकडे दिनांक १८ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मंजूरीसाठी पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, महावितरण वीज कंपनीने औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना सवलत देवून घरगुती वीज ग्राहकांवर वीज दरवाढ सुचविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दरवाढीमुळे अहमदनगर जिल्ह्यातील सुमारे ९० हजार ८३५ घरगुती वीजग्राहाकांवर आर्थिक भुर्दंड पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ही दरवाढ कमी करण्यास शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे. महावितरण कंपनीने सुधारित बहुवर्षीय वीजदर याचिका दिनांक ३.२.२०१५ रोजी राज्य वीज नियामक आयोगाकडे सादर केली आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) अंशतः खरे आहे.

(४) विद्युत कायदा २००३ मधील तरतुदीस अनुसरुन वीज दराची निश्चिती नियामक आयोगाकडून करण्यात येते.

-----------------

**राज्यातील विशेषत: मीरा-भाईंदर, ठाणे, डोंबिवली-कल्याण भागात बनावट रिक्षा बॅज व लायसन्स सर्रास तयार केले जात असल्याबाबत**

**(१७) * १४९६६ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्हा तालुक्यासह मीरा-भाईंदर, ठाणे, डोंबिवली-कल्याण भागात बनावट रिक्षा बॅज व लायसन्स सर्रास तयार केले जात असून ते प्रत्येकी ३० ते ४० हजार रुपयांना खुलेआम विकले जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही मोटार ट्रेनिंग स्कुलच्या आडून रिक्षाचालकांना बनावट बॅज व लायसन्स प्रत्येकी ३० व ४० हजार रुपयांना विकले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बनावट बॅज तयार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याबाबत तसेच सदर प्रकारास आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) असे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे या कार्यालयाच्या अभिलेखावर असलेल्या अनुज्ञप्ती संदर्भात कोणत्याही कामकाजासाठी अनुज्ञप्ती सादर केल्या अभिलेखाची पडताळणी करुनच पुढील कार्यवाही केली जाते. बोगस बॅज व लायसन्स बाबतची बाब ठाणे परिवहन कार्यालयात आढळून आली नाही.

(४) ठाणे परिवहन कार्यालयाच्या भरारी पथकामार्फत ऑटो रिक्षांची नियमित स्वरुपात तपासणी करुन कारवाई करण्यात येते. सदरहू तपासणी दरम्यान बनावट अनुज्ञप्ती व बॅज बाबतची बाब निदर्शनास आल्यास तात्काळ कारवाई केली जाईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आढळगाव (ता.श्रीगोंदा,जि.अहमदनगर), तनवाडी (ता.भोकरदन,जि.जालना) व भंडारवाडी (जि.लातूर) गावात शॉर्टसर्किटमुळे झालेली जीवीत व वित्त हानी**

**(१८) * ७८५२ श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील आढळगाव शिवारात तसेच तनवाडी (ता.भोकरदन, जि.जालना) व लातूर जिल्यातील भंडारवाडी गावातील शॉर्टसर्किटमुळे उसाच्या शेताला आग लागून मोठया प्रमाणात ऊस जळून शेतकऱ्यांचे नुकसान होऊन या आगीत एकाचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना व आगीत मृत्यू पावलेल्या व्यक्तीना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) होय.

(३) सदरच्या तीनही प्रकरणात चौकशीअंती आढळगांव शिवार ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर येथे शॉर्टसर्कीट होऊन ऊस जळून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची व कुठल्याही प्रकारची जीवितहानी झाल्याची तक्रार नोंद महावितरण कंपनीकडे नाही. तनवाडी (ता.घनसावंगी, जि.जालना) येथे ऊसाच्या शेताला आग लागण्याच्या दोन्ही घटना ह्या शॉर्टसर्कीटमुळे झालेल्या नाहीत. दोन्ही घटनेत कोणाचाही मृत्यू झाला नाही. लातूर जिल्ह्यातील भंडारवाडी गावात ऊसाला लागलेल्या आगीचे कारण विद्युत तारेमधील स्पार्कींग नसल्यामुळे सदर आगीस महावितरण कंपनी जबाबदार नसल्याचे आढळून आले आहे. सबब नुकसान भरपाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथे डेलीनिड्स व्यापाऱ्यांनी वाहनांची नोंद न करुन कोट्यवधीचा कर बुडविल्याबाबत**

**(१९) * १४००३ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिज्जा, हॉटेल आणि डेलीनिड्स व्यापारी घरपोच डिलेव्हरी सेवेसाठी दुचाकी वाहन वापरतात परंतु या वाहनांची परमीट वाहन म्हणून नोंदणी करणे अनिवार्य असतानाही पाच वर्षे उलटून गेली तरी नागपूर आरटीओ कार्यालयात अशा प्रतिष्ठीत व्यापाऱ्यांनी आपल्या वाहनांची नोंद केली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डेलीनिड्स व्यापाऱ्यांनी आरटीओचा दरवर्षी कोट्यवधीचा कर बुडविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डेलीनिड्स व्यापा-यांनी आरटीओचा बुडविलेला कोट्यवधीचा कर वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी सदरहू व्यापारी कंपन्यांच्या वाहनांवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) असे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.
(२) व (३) प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (शहर) यांनी तपासणी केलेली सर्व १३ वाहने ही परिवहनेत्तर संवर्गात नोंद असून कंपनीच्या नावे नोंद केल्यामुळे, नोंदणी वेळी तिप्पट दराने कराची वसूली करण्यात आलेली आहे. सदर कर आकारणी ही मुंबई मोटार वाहन कर कायद्यात विहित करण्यात आलेल्या तरतूदी नुसार केली असल्याने या प्रकरणी शासकीय महसूलाची हानी झालेली नाही.
(४) प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर) यांचे भरारी पथकाने पिज्जासारख्या वस्तूची वाहतूक करणा-या १८ वाहनांची तपासणी करुन दोषी आढळलेल्या १३ वाहनांकडून रु.५८००/- इतका दंड वसूल केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसमत तालुक्यातील (जि.हिंगोली) येथील शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान मिळाले नसल्याबाबत

**(२०) * ५६५५ श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील अडीच हजार शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान मिळाले नसल्याने याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे असे निवेदन वसमत तालुक्यातील शेतकऱ्यांनी दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयात अडीच हजार शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत मागील आर्थिक वर्ष २०११-१२, २०१२-१३ चे अनुदान अद्याप मिळालेले नाही. शेती सिंचनासाठी पन्नास ते साठ टक्के अनुदानावर आपल्या शेतीमध्ये शंभर टक्के रक्कम कंपनीला देऊन शेतक-यांनी ठिबक व तुषार सिंचनाचे संच बसवून घेतले आहेत, परंतु अनुदान मिळत नसल्याचे शेतकऱ्यांचे पैसे कंपनीकडे अडकून पडले आहेत तसेच अनुदानाअभावी शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) याबाबत कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही.

(२) सन २०११-१२ या वर्षातील हिंगोली जिल्ह्यातील सूक्ष्म सिंचनाचे सर्व प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्यात आलेले आहेत.

हिंगोली जिल्ह्याकडून सन २०१२-१३ या वर्षातील प्रलंबित प्रकरणांसाठी रु. ६.७९ कोटी एवढया निधीची मागणी करण्यात आली होती, सन २०१४-१५ मध्ये रु. ६.७८ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यापैकी रु. ५.०९ कोटी निधीचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले आहे. उर्वरित निधी वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात खाजगी बस सेवांचे दर एस.टी. महामंडळाच्या दरापेक्षा कमी असल्याबाबत**

**(२१) * ११८६४ श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एस.टी. महामंडळाचे एस.टी. डेपो परिसरात खाजगी वाहतूक बुकींगच्या स्टॉलचा विळखा प्रामुख्याने मुंबई सेंट्रल, दादर, परेल, ठाणे, शिवाजी नगर या ठिकाणी आढळतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाजगी बस सेवांचे दर एस.टी. महामंडळाच्या दरापेक्षा कमी असल्यामुळे प्रवासी खाजगी वाहतूकीकडे वळला जात आहे व त्यामुळे एस.टी. महामंडळाला दरवर्षी ७०० कोटींची झळ सोसावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासाठी एस.टी. महामंडळापासून २०० मीटर परिसरात खाजगी वाहतूक बुकींगचे स्टॉल न ठेवणे तसेच नो पार्कींग झोन असणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

खाजगी वाहतुकदार कमी गर्दीच्या कालावधीत रा.प. प्रवासभाड्यापेक्षा कमी व गर्दीच्या कालावधीत जादा प्रवासभाडे आकारतात. खाजगी वाहतुकीमुळे व खर्चात वाढ झाल्यामुळे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात राज्य परिवहन महामंडळास रु. ५८७ कोटी तोटा झालेला आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वरील सर्व बसस्थानक व परिसरामध्ये २०० मिटर अंतरापर्यंत गाड्या लावण्यास बंदी परिक्षेत्र (नो पार्किंग झोन) जाहिर करण्यात आलेले आहे व त्यांची अंमलबजावणी पोलीस व परिवहन कार्यालयामार्फत करण्यात येते. तसेच २०० मीटर परिसरातील खाजगी वाहतूकदारांनी खाजगी वाहनाच्या प्रवासाची विक्री केंद्रे (बुकींग स्टॉल)

काढण्याबाबतची कार्यवाही नगर विकास विभाग व संबंधित महानगर / नगरपालिका यांच्यामार्फत करण्यात येते.

अवैध प्रवासी वाहतूक व बसस्थानकांच्या लगतच्या गाड्या लावण्यास २०० मीटर बंदी परिक्षेत्रात वाहने (नो पार्किंग झोन) उभी करणाऱ्यांविरुध्द पोलीस आयुक्त (वाहतुक) यांना तसेच बसस्थानकांच्या परिक्षेत्रातील लगतच्या अतिक्रमीत खाजगी वाहनांच्या प्रवासाची विक्री केंद्र यांच्यावर कडक कारवाई करण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ता.मावळ व खेड (जि.पुणे), ता.मोर्शी (जि.अमरावती), ता.श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथील अवैध गौण खनिज उत्खननाबाबत**

**(२२) * ९२८६ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश गोरे (खेड-आळंदी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.मावळ व ता.खेड (जि.पुणे), राजुरवाडी, अंबाडा व सालबर्डी ता.मोर्शी (जि.अमरावती), येथे मुरुम माती व वाळू लागत असल्याने तेथील डोंगरफोड करुन मुरुम व वाळू यांचे अनधिकृतपणे उत्खनन व चोरी केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोसेगव्हाण (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील शासकीय जमीनीमधून बेकायदा मुरुम उत्खनन केल्याप्रकरणी, श्रीराम मॅन्युफॅक्चरिंग कंपनीला तेथील तहसिलदारांनी सुमारे ८४ लाख रुपयांच्या दंडाची नोटीस बजाविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, चौकशीनुसार अशा प्रकारे अवैध मुरुम उपसा करणाऱ्यांवर व दंडाची रक्कम न भरणाऱ्या दोषी कंत्राटदार व कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) पुणे जिल्ह्यातील मावळ व खेड तालुक्यात तसेच अमरावती जिल्ह्यातील राजुरवाडी अंबाडा व सालबर्डी येथे गौण खनिजाच्या अवैध उत्खननाची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे,

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) सन २०१४-२०१५ या वर्षात पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगर (खेड) तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या १३ प्रकरणांमध्ये रुपये २,४८,०००/- व मावळ तालुक्यात १३३ प्रकरणांमध्ये रुपये १,१२,३०,०८९/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

अमरावती जिल्ह्यातील मौजे राजुरवाडी, अंबाडा व सालबर्डी परिसरात माहे जानेवारी, २०१५ मध्ये वाळू व माती या गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ६ प्रकरणांत रुपये ५४,६००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील मौजे कोसेगव्हाण, ता.श्रीगोंदा येथील रस्त्याच्या कामासाठी मे. लाईटनर श्रीराम मॅन्युफॅक्चरींग प्रा.लि. या कंपनीने २,६४७ ब्रास मुरुमाचे अनधिकृत उत्खनन केल्यामुळे, तहसिलदार श्रीगोंदा यांनी रुपये ८४,७०,४००/- इतक्या दंडाचे आदेश पारित केले असून, वसूलीची कार्यवाही सुरु आहे. तसेच कंपनीविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल केला आहे.

-----------------

**वणी तालुक्यातील घोन्सा येथील विदर्भ नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणात मातीचे उत्खनन होत असल्याबाबत**

**(२३) * १३७१४ श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी तालुक्यातील घोन्सा येथील विदर्भ नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणात जेसीबी मशीनने मातीचे उत्खनन होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घोन्सा ग्रामपंचायत कार्यालय क्षेत्रातील शेत सर्व्हे नंबर ४६/२, ४६/३, ४६/४ मध्ये विजय अर्जुन जीवने व विलास नथ्थु डाऊले यांनी ग्रामपंचायत कार्यालयाची परवानगी न घेता अनधिकृतपणे अवैधरीत्या माती उत्खनन करून वीट बनविण्याचे काम सुरू आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या जमिनीवर वेकोलि घोन्सा सेक्शन ११/१ लागू असून केंद्र शासनाचे अधिकार स्थापित असून ही जागा गावाच्या ४०० मीटर क्षेत्राच्या आत असल्यामुळे विटभट्ट्यांपासून दूषित वायू प्रदूषणामुळे घोन्सा गावातील गावकऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) वणी तालुक्यातील मौजे घोन्सा येथील शेत सर्वे नंबर ४६/२, ४६/३, ४६/४ मध्ये विनापरवाना माती उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार संबंधितांविरुध्द रुपये ८३,५६८/- इतक्या रकमेच्या दंडाचे आदेश पारित करण्यात आले असून दंडाच्या रकमेच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

विटभट्ट्यापासून वायू प्रदूषणामुळे घोन्सा गावातील गावक-यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, असे निदर्शनास आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### रत्नागिरीतील मरिन इंजिनिअरिंग कॉलेजच्या इमारतींचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२४) * १३३१९ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथे मरिन इंजिनिअरिंग कॉलेज उभारण्याकरिता १७ कोटी रुपये खर्चून इमारतींचे बांधकाम सुरु आहे, परंतु उर्वरित काम निधीअभावी बंद असल्याचे नुक्तेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारतीचे काम निधीअभावी प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त इमारतीला तात्काळ निधी उपलब्ध करुन सदरील कॉलेजच्या इमारतींचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) व (३) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत शिरगाव, जिल्हा रत्नागिरी येथील मत्स्य अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इमारत बांधकामांसाठी सन २०१०-११ ते सन २०१४-१५ या कालावधीत एकूण रु.८.८४ कोटी इतके अनुदान शासन स्तरावरुन वितरीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### कार्ला व कुमठा (जि.लातूर) येथील भूकंपग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२५) * ११८८० श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा तालुक्यातील (जि.लातूर) मौजे, कार्ला व कुमठा या गावांतील सन २००७ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या भूकंपामुळे घरांचे खाजगी मालमत्तेचे तसेच सार्वजनिक मालमत्तेचे कोट्यवधीचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कार्ला व कुमठा येथील भूकंपग्रस्तांना आजमितीस घरांच्या नुकसानीबाबत शासनाकडून कोणतीही भरपाई देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू भूकंपग्रस्तांना घरांच्या नुकसानींची भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) २००७ च्या भूकंपामध्ये बाधीत ७३३ कुटुंबाच्या घरांची दुरुस्ती/पुर्नबांधणी करण्याचे अनुषंगाने विश्वेश्वरैय्या नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूर यांचेकडून कार्ला व कुमठा येथील बाधीत घरांची दुरुस्ती/पुर्नबांधणी बाबत अहवाल तसेच आयआयटी, मुंबई यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांचेकडून दुरुस्ती/पुर्नबांधणीच्या खर्चाचे अंदाजपत्रक मागविण्यात आलेले आहे. त्याबाबत पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लोहा शहराच्या (जि.नांदेड) मध्यवर्ती भागातील संपादित केलेल्या जमिनीची परस्पर विक्री झाल्याबाबत**

**(२६) * १५४०३ श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा शहराच्या (जि.नांदेड) मध्यवर्ती भागात १५ वर्षापूर्वी माजलगांव कालवा विभाग क्र.७ साठी सर्वे क्रमांक ११४ मधील संपादित केलेली ६५ आर इतक्या जमिनीची परस्पर विक्री झाल्याची घटना दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली आहे,

(३) अद्यापही चौकशी केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.

सर्वे नं. ११४ मधील जमीनीची विक्री झालेली आहे. परंतु सदर जमिन संपादित झालेली नाही.

(२) होय.

सदर प्रकरणी उप विभागीय अधिकारी, कंधार यांचे मार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. दि. १७.१२.८८ रोजी सर्वे नं.११४ मधील ४.८० हे. जमीनीचा भुसंपादन प्रस्ताव कार्यकारी अभियंता माजलगांव वि.क्रं.७ यांनी सादर केला होता. नंतर दि. १२.०७.९० च्या पत्रान्वये ३.६५ हे.क्षेत्राचेच भूसंपादन करावे असे त्यांनी कळविले. त्यानुषंगाने भूसंपादन कार्यवाही सुरु झाली होती. प्रकरणात कलम ६ ची अधिसूचना दि. ६.९.२००१ रोजी राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर त्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत निवाडा घोषित होणे कायद्याने बंधनकारक आहे.

परंतु भुसंपादनासाठी आवश्यक निधी संपादक संस्थेने विहीत कालावधीमध्ये जमा न केल्यामुळे भुसंपादन प्रकरण व्यपगत झाले आहे.

भूसंपादन प्रकरण व्यपगत झाल्यानंतर दि. २९.१२.२०१४ रोजी जमीन विक्री केली आहे. संपादित जमिनीची विक्री झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाशिम तालुक्यामधील (जि.वाशिम) कोंडाळा येथील भवानी माता मंदिराची जागा बळकावून विकल्याबाबत**

**(२७) * १२७११ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम तालुक्यामधील (जि.वाशिम) कोंडाळा झामरे या गावामध्ये ग्राम सचिवांशी संगनमत करून भवानी माता मंदिराची जागा बळकावल्यानंतर ती विकण्यात आली असून सदर जमीन मंदिराची आहे असे शासकीय दप्तरी नोंद असून याबाबत जमिन विकणाऱ्या संबंधिताची दि. ४ जानेवारी, २०१५ रोजी तक्रार करून सुध्दा कोणतीच कारवाई होत नाही आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार ही जागा बळकावून विकणाऱ्या व्यक्तींविरुध्द व त्याला मदत करणाऱ्या ग्रामसेवकाविरूध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) असल्यास, अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३)

प्रस्तुत प्रकरणी सन २००४-०५ मध्ये तत्कालीन ग्रामसेवक यांचेशी संगनमत करुन ग्रामपंचायत नमुना नं ८ मध्ये फेरफार करुन मंदीराशेजारील जागा विक्री करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि प्रस्तुत अतिक्रमणाच्या अनुषंगाने बाब न्यायप्रविष्ट आहे.

प्रस्तुत प्रकरणातील ग्रामसेवक सद्य:स्थितीत सेवानिवृत्त झाले असून दि.१/५/२०१४ रोजी मयत झाले आहेत. तथापि त्यांचेविरुध्द अन्य एका प्रकरणांतर्गत दाखल झालेल्या फौजदारी गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांचे सेवानिवृत्ती विषयक लाभ अद्यापपर्यंत देण्यात आलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांदिवली (पूर्व), नरसीपाडा, हनुमान नगर, आकुर्ली येथील शासकीय विहिरीच्या भोवतालच्या भूखंडावर अनधिकृत बांधकाम/व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(२८) * १४०८० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (पूर्व), नरसीपाडा, हनुमान नगर, आकुर्ली रोड येथील सी.टी.एस. क्रमांक १६३ सर्व्हे क्रं.१३ मधील शासकीय विहिरीच्या भोवतालच्या २५०० चौ.मी. भुखंडापैकी १८७५ चौ.मी. क्षेत्रफळांच्या भूखंडावर श्री.सलीम शेख ही व्यक्ती अनधिकृत बांधकाम करुन व्यवसाय करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर श्री.सलीम शेख या व्यक्तीने शिव वेल्फेअर सोसायटी तयार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सोसायटीतर्फे केलेल्या अनधिकृत बांधकामासंदर्भात मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता सदरची याचिका न्यायालयाने फेटाळलेली असून निर्णय शासनाच्या बाजूने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित अनधिकृत बांधकाम/व्यवसायाबाबत वारंवार सहाय्यक संचालक भारतीय क्रिडा प्राधिकरण, स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक रहिवाशांमार्फत तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संबंधित व्यक्तीवर व अनधिकृत बांधकाम व व्यवसायावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, कारवाई न करण्याचे कारणे काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) कांदिवली (पूर्व), नरसीपाडा, हनुमान नगर, आकुर्ली येथील सी.टी.एस. क्रमांक १६३ सर्व्हे क्र.१३ या २५०० चौ.मी. भूखंडापैकी १८७६ चौ.मी. क्षेत्रावर शिव वेल्फेअर सह.गृह.संथेने (नियोजित) अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेत श्री.सलीम शेख हे सदस्य आहेत.

(३) शिव वेल्फेअर सह.गृह.संस्थेने गृहनिर्माण संस्थेसाठी भूखंड प्रदान करण्याबाबत शासनास केलेली विनंती मान्य केल्याने सदरहू संस्थेने महाराष्ट्र शासन व इतर यांच्याविरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.२०२६/१९९९ दाखल केली होती. सदरहू रिट याचिका मा.न्यायालयाने दि.०१.०८.२००० रोजी निकाली काढून संस्थेची (याचिकाकर्त्यांची) विनंती अमान्य केली आहे.

(४), (५) व (६) होय, हे खरे आहे.

सदर जमिनीवरील अनधिकृत बांधकामे दि.०९.०७.१९९९, दि.२२.०६.२००४, दि.२३.०८.२०१० व दि.३०.१०.२०१० रोजी निष्कासित करण्याची कार्यवाही उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), बोरीवली या कार्यालयाकडून करण्यात आली आहे.

सदर अतिक्रमण विरहीत भूखंडावर अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे होऊ नयेत या दृष्टीने सुरक्षा रक्षक ठेवून भूखंडाच्या रक्षणाची जबाबदारी उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा

यांनी सहायक संचालक, स्पोर्टस ऑथोरिटी ऑफ इंडिया यांना दि.२८.०७.१९९९ रोजीच्या पत्राने कळविले आहे. त्यानुसार सदर मोकळ्या भूखंडाचे संरक्षण करण्याची जबाबदारी संचालक, स्पोर्टस ऑथोरिटी ऑफ इंडिया यांची आहे. तथापि, सदरहू मोकळ्या भूखंडाच्या संरक्षणाबाबत योग्य ती काळजी त्या प्राधिकरणाकडून घेण्यात न आल्याने व त्यावर श्री.सलिम शेख यांचे अतिक्रमण झाल्यावर व उच्च न्यायालयाने त्यांचा दावा फेटाळून लावल्यावर श्री.शेख यांनी मा.नगर दिवाणी न्यायालयात २९५७/०३ व ८५४/०७ आणि १५७७/०९ दावे दाखल केले. ताथापि, त्यांना स्थगिती प्राप्त न झाल्याने ती अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. श्री.सलिम अब्दुल शेख हे दि.०९.०४.२०१४ रोजी मयत झाले आहेत. सध्या जागेवर १६२२.५० चौ.मी. इतक्या क्षेत्रावर अतिक्रमण आढळून आले आहे.

सदर जमिनीबाबत श्री.शाहू शिवराम देसाई व इतर १ विरुध्द सलिम अब्दुल शेख हा दावा क्र.६२३/२०१० मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल होता. सदर दावा तद्नंतर नगर दिवाणी न्यायालय, दिंडोशी यांच्याकडे वर्ग करण्यात आला. सदर दाव्यामध्ये याचिकाकर्त्यांने दावा मागे घेतल्याने दि.३०.१०.२०१० रोजी दावा निकालात काढण्यात आला. तसेच सदर मिळकतीवरील कोर्ट रिसिव्हर यांची नियुक्त मा.नगर दिवाणी न्यायलय, मुंबई यांचे आदेश दि.११०३.२०१५ अन्वये रद्द केली आहे. त्यामुळे सदर मिळकतीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत शासकीय अभियोक्ता यांचे अभिप्राय मागविण्यात आले असून सदर अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**शासनाच्या शेती पीक कर्ज योजनेसाठी जमिनीचे खोटे सातबारा व आठ 'अ' तयार करुन शासनाची फसवणूक केल्याबाबत**

**(२९) * १२०४४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या शेती पीक कर्ज योजनेसाठी जमिनीचे बनावट सातबारा व आठ 'अ' चे दाखले तयार करुन बँक ऑफ इंडिया बेणसे, (ता.पेण, जि.रायगड) शाखेतून ० टक्के व्याज दराने कर्ज काढून झोतिरपाडा, (ता.पेण, जि.रायगड) येथील काही व्यक्तींनी शासनाची व बँकेची मोठ्या प्रमाणात फसवणूक केल्याची तक्रार स्थानिक संघटना व नागरिकांनी माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधितांची चौकशी करुन कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, रायगड यांनी तहसिलदार, पेण, जि.रायगड यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकाशी करून संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) भ्रष्ट्राचार निर्मूलन संघटना, झोतिरपाडा विभाग, पेण यांनी दि. १२/१२/२०१४ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे अशा आशयाची तक्रार केली आहे.

(२) जिल्हाधिकारी, रायगड यांनी दि. २०/१२/२०१४ च्या पत्रान्वये तहसिलदार, पेण यांना प्रकरणी चौकशी करुन उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी चौकशी अंती १६ व्यक्तींनी बनावट कागदपत्रे सादर केल्याचे आढळून आल्याने पोलीस ठाणे, नागोठणे येथे १६ व्यक्तींविरुध्द दि. ०३/०३/२०१५ रोजी तलाठी सजा शिहू यांनी गुन्हा दाखल केलेला असून पोलीसांमार्फत पुढील तपास सुरु आहे.

----------------

**बुटीबोरी, (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील रहदारीच्या ठिकाणी अवैधरित्या देशीदारू व विलायती दारूची विक्री होत असल्याबाबत**

**(३०) * १४८४६ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुटीबोरी, (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील पंचतारांकित म.औ.वि.म.येथील चौकात रहदारीच्या ठिकाणी अवैधरित्या ६ बियरबार व १ देशीदारू व विलायती दारूच्या दुकानात मोठ्या प्रमाणात विक्री होत असून त्याचा त्रास शाळेतील विद्यार्थी, ये-जा करणाऱ्या ग्रामस्थ व महिलांना होत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशीत मद्यविक्रीचे दुकान त्वरीत बंद करण्याची मागणी दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू चौकातील मद्यविक्रीचे दुकाने बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) याबाबत श्री.समीर मेघे, विधानसभा सदस्य (हिंगणा) यांचे दि. ९.१२.२०१४ रोजीचे निवेदन प्राप्त झाले असून त्यामध्ये सदर बाब नमूद आहे.

(३) चौकशीमध्ये सदर ठिकाणी असलेल्या बीअर बार तसेच देशी व विदेशी मद्याच्या अनुज्ञप्ती धारकांकडून कोणताही नियमभंग / विसंगती झाल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे त्यांचेवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मद्य विक्रीची दुकाने बंद करण्याबाबत शासन अधिसूचना दि. २५ मार्च, २००८ व दि. १२.२.२००९ नुसार कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार एखाद्या गावातील किंवा प्रभागातील २५ टक्केपेक्षा कमी नसलेल्या महिला मतदारांनी अथवा एकूण मतदारांनी प्रभागातील मद्यविक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांकडे निवेदन दिल्यास त्यांच्याकडून संबंधित गावात किंवा प्रभागात दारुबंदी करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येते. सदर तरतूदीनुसार कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खेड तालुक्याला (जि.रत्नागिरी) चक्रीवादळाचा तडाखा बसून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्याबाबत**

**(३१) * ६२२० श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्याला (जि.रत्नागिरी) माहे मे, जून, ऑगस्ट व ऑक्टोबर, २०१४ या काळात चक्रीवादळाचा तडाखा बसला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वादळात ७१५ जणांच्या घरांचे अंशत: ३ घरांचे पूर्णत: २९ गोठे, १५ शाळा व ८ सार्वजनिक मालमत्ता यांचे मिळून ८,२०,१६९/- रुपयांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्तांना भरपाई त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही, हवामान खाते कुलाबा यांचे अहवालानुसार चक्रीवादळाची नोंद नाही.

(२) दिनांक ४, ६ व ७ मे, २०१४ आणि दि. १६.१०.२०१४ रोजी वादळ झाले होते. या वादळामध्ये एकूण ७१५ जणांचे अंशतः घरे, ३ घरे पूर्णतः २९ गोठे अंशतः १५ शासकीस शाळा व ८ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

(३) नैसर्गिक आपत्तीच्या नुकसान भरपाई निकषानुसार पात्र आपदग्रस्तांना आर्थिक मदतीचे वाटप शासन स्तरावरुन प्राप्त अनुदानातून करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्रीगोंदा तालुक्यातील शेतकरी अनुदानापासून वंचित असल्याबाबत**

**(३२) * १११७५ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा तालुक्यातील सन २०१२-२०१३ या रब्बी हंगामात निसर्गाच्या प्रकोपामुळे सुमारे ९९ हजार ८१८ शेतकऱ्यांचे नुकसान होऊन यासाठी शासनाने ४६ कोटी ८८ हजार रुपये अनुदान मंजूर केले होते, त्यापैकी ३६ कोटी रुपयांचे अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आले, त्यापैकी १५ हजार शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १५ हजार शेतकऱ्यांना सन २०१२-२०१३ या रब्बी हंगामातील सुमारे ८ कोटी रुपयांच्या पिकांची नुकसान भरपाई अद्यापही देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) व (३) हे खरे आहे.
निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्याच्या सीमेवरील चंद्रपूर जिल्हयातील १२ गावांच्या सीमावादावर तोडगा काढण्याबाबत**

**(३३) * १४६०० श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.भिमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या सीमेवरील चंद्रपूर जिल्हयातील १२ गावांची मालकी महाराष्ट्राकडे की आंध्रप्रदेशकडे हा वाद मागील २५ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, महाराष्ट्र व तेलंगणा राज्य सिमेवरील असलेल्या चंद्रपूर जिल्हयातील जिवती तालुक्यातील १४ गावांबाबतचा सुप्रिम कोर्टाने दिनांक १७ जुलै, १९९७ रोजी दिलेल्या आदेशनुसार तहसील जिवती मध्ये समाविष्ट केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सिमावर्ती भागातील जिवती तहसील मधील ८४ गावाचा महसुल रेकॉर्ड उपलब्ध असून सर्वोच्य न्यायालयाचे आदेशनुसार तहसील जिवती मध्ये समाविष्ट १४ गावाचा महसूल रेकॉर्ड उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रश्नांसंदर्भात तोडगा काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) ते (५) चंद्रपुर जिल्हयातील जिवती तालुक्यातील प्रश्नाधीन गांवावरील मालकी संदर्भात तत्कालीन आंध्रप्रदेश व महाराष्ट्र राज्यामधील सीमावादाबाबत आंध्रप्रदेश शासनाने हैद्राबाद उच्च न्यायलयात याचिका दाखल केली होती व त्यात सदर गावात महाराष्ट्र शासनाने हस्तक्षेप न करण्याचे अंतरिम आदेश सदर न्यायलयाने दिले होते. मात्र सदर आदेशाविरुध्द महाराष्ट्र शासनाने मा.सर्वोच्च न्यायलयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिकेत मा.सर्वोच्च न्यायलयाने हैद्राबाद उच्च न्यायालयाच्या आदेशास स्थगिती देवून याचिका ३ महिन्यांच्या आत निकाली काढण्याचे निर्देश हैद्राबाद उच्च न्यायालयास दिले होते. तथापि तत्कालीन आंध्रप्रदेश शासनाने प्रश्नाधीन गावांवरील मालकी संदर्भात हैद्राबाद

उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका मागे घेतलेली असल्याने या गावांवरील महाराष्ट्र शासनाची मालकी अबाधित आहे. सदर गावांना महसूली गावाचा दर्जा देण्यात आलेला आहे. सदर गावातील नागरिकांच्या नावांचा समावेश महाराष्ट्र राज्याच्या मतदार याद्या व जनगणना यादीत आहे. सदर गावांमध्ये राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजना कार्यरत आहेत.

तेलंगणा व महाराष्ट्र राज्यांच्या सिमेवरील १४ गावांचा भूमि अभिलेख तयार करण्याच्या दृष्टीने विशेष बाब म्हणून जमीन मोजणी करण्याबाबतचा प्रस्ताव जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१४ अन्वये शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावामधील त्रुटींची पुर्तता करुन फेरसादर करण्याबाबत जमाबंदी आयुक्त यांना दिनांक १६.१०.२०१४ च्या शासनाच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने पूर्तता करुन प्रस्ताव जमाबंदी आयुक्तांच्या दिनांक २०.०१.२०१५ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाची छाननी शासनस्तरावर सुरु आहे.

-----------------

**अचलपूर तालुका व धारणी शहरासह (जि.अमरावती) तसेच ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा खाडीतून रेतीची चोरी होत असल्याबाबत**

**(३४) * ६१०७ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर तालुका व धारणी शहरासह (जि.अमरावती) संपूर्ण तालुक्यात अधिकाऱ्यांच्या संगनमताने शासकीय गौण खनिजाची चोरी होत असून धारणी तालुक्यातील तापी, गडगा, सिपना आणि डवाल इत्यादी ठिकाणच्या नदीपात्रातून प्रतिबंधित क्षेत्रातून रेतीची चोरी होत असल्याचे व जिल्हा परिषद शाळेच्या (ता.धारणी,जि.अमरावती) आवारात रेतीची साठवणूक केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा खाडीतून रेतीची खुलेआम चोरी होत असून ठाणे जिल्ह्यातील बेकायदेशीर रेती उपसा थांबविण्यासाठी स्वतंत्रपणे सक्षम यंत्रणा उभी करण्यासाठी स्थानिक प्रशासनाने सन २०१४ मध्ये शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावावर अद्याप निर्णय घेण्यात आलेला नसल्याचे माहे डिसेंबर,२०१४ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यात वाळू उपशाबाबतचे बारकोड पध्दतीचे सुधारित धोरण माहे मार्च, २०१३ पासून लागू करण्यात आले आहे असून त्यातूनही पळवाटा काढण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वाळूमाफिया व संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच बेकायदेशीर रेती उपसा थांबविण्याबाबत प्रश्न भाग २ व ३ च्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अचलपूर व धारणी तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, अधिकाऱ्यांच्या संगनमताने गौण खनिजांची चोरी होत असल्याचे व जिल्हा परिषद शाळा धारणीच्या आवारात जानेवारी २०१५ च्या दरम्यान रेतीची साठवणूक केली असल्याचे निदर्शनास आले नाही.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीवर प्रतिबंध घालण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या भरारी पथकांद्वारे सन २०१४-२०१५ मध्ये धारणी तालुक्यात ५४ प्रकरणात रुपये ४,२३,४७५/- इतका दंड व अचलपूर तालुक्यात १८७ प्रकरणात रुपये २४,५५,२३२/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(२) अशा प्रकारचा प्रस्ताव स्थानिक प्रशासनाकडून शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) व (४) असे निदर्शनास आलेले नसल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्मॅट्स (Sand Mining Approval And Tracking System) प्रणाली राज्यात सन २०१४-२०१५ पासून लागू करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शेगांव (जि.बुलढाणा) येथील एन.ए.लेआऊट मधील २४ प्लॉट विक्री होण्यासाठी सुधारीत आदेश काढून उपविभागिय अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार**

**(३५) * १५०४२ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेगांव (जि.बुलढाणा) येथील एन.ए.लेआऊट मधील २४ प्लॉट क्षेत्रफळ मोठे असल्यामुळे त्याची विक्री होत नसल्याने यासाठी सुधारित आदेश काढून तत्कालीन उपविभागीय अधिकारी, श्री.मोहड यांनी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली आहे,
(३) या प्रकरणाची अद्यापी चौकशी केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मौजे शेगांव, जि. बुलढाणा येथील स.नं. ३९३/२ मधील २.०२ हे आर. शेतजमीन उपविभागीय अधिकारी, खामगाव यांच्या दि.६/२/१९८५ च्या आदेशानुसार अकृषिक करण्यात आली होती. सदर जमिनीच्या भूखंडाचे मालकांनी सुधारीत अकृषिक आदेश मिळण्याची विनंती केली होती. त्यानुसार दि.१२/७/२००३ रोजी उपविभागीय अधिकारी, खामगाव यांनी सुधारीत आदेश पारीत केला व त्यात पूर्वीच्या आदेशाप्रमाणे अभिन्यासातील राखून ठेवलेल्या खुल्या जागेतही प्लॉट पाडण्यात आले. याबाबत दि.७/५/२०१२ रोजी तालुका भ्रष्टाचार निर्मुलन समिती, शेगांव यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली आहे. तसेच दि.३/२/२०१५ च्या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली आहे.

या संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित नस्तीचा शोध घेण्यात आला असता सदर प्रकरण कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध होत नसल्याने पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन, (खामगाव शहर), खामगाव यांचेकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याबाबत व संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

## नागपूर येथील वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण (वनामती) संस्थेचा निधी पुण्याच्या कृषी आयुक्तालयातील दालनाच्या नुतनीकरणासाठी खर्च करण्यात आल्याबाबत

**(३६) * १४२४६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण (वनामती) संस्थेला विस्तार व प्रशिक्षण विस्तार सुविधेसाठी केंद्रापासून ५० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला असतांना मात्र पुण्याच्या कृषी आयुक्तालयातील दालनाच्या नुतनीकरणासाठी खर्च करण्यात आल्याची माहिती दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५० लाख रुपये निधी हा एकाच दिवसात खर्च करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

सन २०१०-११ मध्ये राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणाकरिता सहाय्य (आत्मा) या केंद्र पुरस्कृत योजनेच्या कृती आराखड्यामध्ये रु. ५० लाख रक्कम इमारती दुरुस्ती व नूतनीकरण या बाबीकरिता मंजूर होती व त्याप्रमाणे खर्च करण्यात आली आहे.

(२) नाही.

कामांचे एकंदरीत देयके सां.बां.वि. पुणे यांनी दि. ३.८.२०११ रोजी देण्यात आले.

(३), (४) व (५) चालू वर्षाचा (सन २०११-१२) आराखडा मंजूर होईपर्यंत मागील वर्षाचा (सन २०१०-११) चा शिल्लक निधी विविध कार्यक्रमासाठी उपयोगात आणण्याबाबत केंद्र शासनाचे निदेश होते. त्यानुसार सन २०१०-११ च्या अखर्चीत निधी रु. ४९.७४ लक्ष सन २०११-१२ मध्ये वापरण्यात आला असून आत्मा या योजनेचे कृषि संचालक (वि.व.प्र.) हे राज्यस्तरावर नोडल अधिकारी असल्यामुळे राज्यातील आत्मा योजना राबविण्यासाठी पुणे येथील प्रशिक्षण हॉल, नूतनीकरण व इतर अनुषंगिक कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यप्रणालीनुसार सदरचा खर्च करण्यात आला आहे, त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विशेष पॅकेज अंतर्गत गाई वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(३७) * १४२५५ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत असल्याने त्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्याकरिता विशेष पॅकेज अंतर्गत गाई वाटप करण्यात आल्या होत्या, परंतु या वाटपात प्रचंड गैरव्यवहार झाला असून अकोला जिल्ह्यातील या गैरव्यवहाराची चौकशी गेल्या ७ वर्षापासून करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गाई वाटप प्रकरणी झालेल्या गैरव्यवहाराची गेल्या ७ वर्षापासून चौकशी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करुन सदरहू प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने काय कारवाई केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) उक्त गाई वाटप प्रकरणी चौकशी करण्यात आलेली असुन, चौकशी समितीच्या निष्कर्षाप्रमाणे विशेष पॅकेज अंतर्गत गाई वाटपात गैरव्यवहार झाला नसल्याचे, आढळून आले आहे.

(४) बाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला शासनाने शेतकरी अपघात विमा सुरु करण्याबाबत

**(३८) * ६२२८ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला आधार मिळावा या हेतूने शासनाने शेतकरी अपघात विमा सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १ कोटी ६३ लाख ९८ हजार ९३५ शेतकऱ्यांना विमा संरक्षण मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेत शेतक-यांना फक्त अपघाती मृत्यु झाल्यानंतरच लाभ दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विमा योजनेच्या जाचक अटीमुळे (उदा. स्थळ पंचनामा, शवविच्छेदन दाखला, वारस तपास आदि बाबींच्या पूर्ततेसाठी लागणारा वेळ) प्रस्ताव सादर केल्यानंतर तो मंजूर होईपर्यंत मुदत संपून जाते व शेतकरी कुटुंबांना लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विमा कंपनीला शासनाकडून मोठ्या प्रमाणात हप्ता देऊनही शेतकऱ्यांना विम्याचा लाभ देतांना अडवणुक केली जाते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या जाचक अटी शिथिल करण्यासंदर्भात व विमा कंपन्यांच्या अडवणूकीबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला आधार मिळावा या हेतूने शासनाने शेतकरी अपघात विमा योजना सुरु केलेली आहे हे खरे आहे.

(२) या योजनेअंतर्गत राज्यातील १ कोटी ३६ लाख ९८ हजार ९६५ खातेदार शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्यात आलेले आहे.

(३) या योजनेअंतर्गत पुढील कारणांमुळे मृत्यु अथवा अपंगत्व आल्यास शेतकऱ्याला विमा अथवा त्याच्या कुटूंबाला संरक्षित रक्कम देण्यात येते.

१) रस्ता / रेल्वे अपघात, २) पाण्यात बुडून मृत्यु, ३) जंतूनाशके हाताळतांना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा, ४) विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, ५) वीज पडून मृत्यु, ६) खून, ७) उंचावरुन पडून झालेला अपघात, ८) सर्पदंश व विंचूदंश, ९) नक्षलवाद्यांकडून झालेल्या हत्या, १०) जनावरांच्या खाल्यामुळे/चावण्यामुळे जखमी/मृत्यु, ११) दंगल, १२) अन्य कोणतेही अपघात

(४) हे खरे नाही.

विमा प्रस्ताव विहित कागदपत्रांसह योजनेच्या कालावधीत कधीही प्राप्त झाला तरी तो विचारात घेणे तसेच अखेरच्या दिवसात झालेल्या अपघातांसाठी योजनेच्या चालू वर्षाचा मंजूर कालावधी संपल्यांनतर ९० दिवसांपर्यंत तालुका कृषि अधिका-यांकडे प्राप्त झालेले प्रस्ताव

स्विकारणे विमा कंपनीवर बंधनकारक करण्यात आलेले आहे. शिवाय समर्थनीय कारणांसह ९० दिवसानंतर प्राप्त होणारे विमा प्रस्ताव सुध्दा स्विकारणे विमा कंपनीवर बंधनकारक करण्यात आलेले आहे.

(५) हे खरे नाही.

(६) शासनाने विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करुन अपघातग्रस्त शेतक-याला अथवा त्याच्या कुटूंबियांना वाजवी नुकसान भरपाई मिळावी म्हणून शासनाने विमा सल्लागार कंपन्यांची नियुक्ती केलेली आहे. विमा कंपन्यांसंदर्भात काही तक्रारी प्राप्त झाल्यास शासन यंत्रणेमार्फत त्याची त्वरेने दखल घेतली जाते.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यात डाळिंबाच्या बागांवर तेल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(३९) * १११७८ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातील घोटवी, पारगाव व आढळगाव या भागातील शेतकऱ्यांनी सुमारे १७०० हेक्टर क्षेत्रावर डाळिंबाच्या बागा उभारल्या, हे खरे आहे काय,

(२) या डाळिंबाच्या बागांवर तेल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे तेथील शेतकऱ्यांनी सुमारे १५० एकराहून अधिक क्षेत्रातील डाळिंबाची झाडे ट्रॅक्टरच्या सहाय्याने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये काढून टाकले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) या डाळिंब बागांसाठी शेतकऱ्यांनी एकरी लाखो रुपये खर्च करुन बागा जगविल्या, परंतु तेल्या रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.

(४) डाळींबावरील तेलकट डाग, मर रोग यासंदर्भात फलोत्पादन पिकांवरील किडरोग सर्व्हेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प अंतर्गत डाळींब पिकावरील तेलकट डागाचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या वर (Economic Thr/eshold level ) असल्यास सदर रोगाचे नियंत्रणाकरीता ५० टक्के अनुदानावर औषध पुरवठा करण्यात येतो.

डाळींब पिक व्यवस्थापन याबाबत कृषी विभागामार्फत कार्यशाळेचे वेळोवेळी आयोजन करण्यात येऊन शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. ज्या शेतक-यांनी बागा काढून टाकलेल्या आहेत, अशा शेतक-यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

अथवा रोजगार हमी योजना या फळबाग योजनेअंतर्गत नव्याने लागवड करण्यासाठी प्राधान्य देण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत  नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यातील जमिन निवासी प्रयोजनासाठी अकृषिक करण्याच्या आदेश पारित केला असल्याबाबत**

**(४०) * १४२४८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्याअंतर्गत होणाऱ्या मौजा आकापूर येथील गट नंबर ३५ चे तलाव असून या तलावाच्या माध्यमातून शेकडो शेत जमिनीचे सिंचन होत आहे असे असतांना सुध्दा तत्कालीन उपविभागीय अधिकारी (महसूल) मूल यांनी सेवानिवृत्त व्हायच्या काही तासापूर्वी दिनांक ३१ जुलै, २०१४ रोजी श्री.जिवन भेय्याजी कोतमवार, रा.मूल यांना निवासी प्रयोजनासाठी अकृषिक करण्याचा आदेश पारित केला असल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आकापूरच्या नागरिकांनी माहिती अधिकारात दिनांक २० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या माहितीच्या कागदपत्रामध्ये असा आदेश पारित झालेला नाही असे म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भुमाफियांच्या संगनमताने उपविभागीय अधिकाऱ्याने दिनांक ३१ जुलै, २०१४ पारित केलेले आदेश हा वैध की अवैध आहे याबाबत राज्य शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, याबाबत होत असलेल्या, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) (२) (३) (४) व (५) मौजा आकापूर ता.मूल जि.चंद्रपूर येथील सर्व्हे क्र. ३५ आराजी २.३६ हे आर ही जमीन श्री. जिवन भैय्याजी कोंतमवार यांच्या मालकीची असून, त्यांनी सदर जमीनीस निवासी वापरासाठी अकृषिक परवानगीकरीता दि. १९.०६.२०१४ रोजी अर्ज दिलेला होता.

सदर प्रकरणी अकृषिक परवानगी देण्यासंबंधी आदेश कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध नसल्याने उपरोक्त जमीन अकृषिक करण्याबाबत आदेश झालेला नसून, आदेश उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, मूल यांनी माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेल्या एका अर्जाच्या अनुषंगाने संबधित अर्जदारास दि.२०.१२.२०१४ रोजी कळविले होते.

तथापि उक्त जमीनीस अकृषिक परवानगी देण्यासंदर्भात त्यांना मिळालेल्या दि. ३१.०७.२०१४ च्या आदेशाची छायाप्रत श्री.कोंतमवार यांनी दि. ३०.०१.२०१५ च्या अर्जासोबत जोडून, सदर आदेश खोटे आहेत का याची शहानिशा करण्याची विनंती उपविभागीय अधिकारी मूल यांना केली आहे. सदर प्रकरणी उक्त आदेशाच्या सत्य-असत्यबाबत सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दि. ११.०३.२०१५ च्या पत्रान्वये अप्पर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिले आहेत.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.